# संशोधन संचालनालय,
# डॉ. पंजाबराव दंशमुख कृषि विद्यापीठ, अकोला - ४४४ १०४

**डॉ. एस. एस. माने**
एम. एस्सी. (कृषि), पी.एच.डी. (व.रो.शा.),
आय.ए.आर.आय., नवी दिल्ली,
एआरएस/नेट-९६
**संशोधन संचालक**

फोन नं. (ऑ.) ०७२४-२२५८४१९
*ई-मेल — director_res@pdkv.ac.in*

---

संशो. सं./भांडार/ ६६ /२०२६ दि २४/०४/२०२६

## जाहीर लिलाव

विषय :- संशोधन संचालनालय या विभागातील असलेले जड वस्तू संग्रहाची व इतर वस्तूंची विक्री करण्याकरिता जाहीर लिलाव करण्याबाबत.

उपरोक्त विषयाचा अनुषंगाने, संशोधन संचालनालय, डॉ. पं.दे.कृ.वि.अकोला या विभागातील आयुमर्यादा समाप्त झालेल्यापैकी निरुपयोगी व नादुरुस्त अशा जड वस्तू इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, यंत्रसामुग्री, संगणक, ताकडी वस्तु व ईतर वस्तुचा जाहीर लिलाव रीतसर प्रक्रियेद्वारे करणे प्रस्तावित आहे. त्या अनुषंगाने सदर वस्तू संशोधन संचालनालय, डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला, या विभागामध्ये पाहणी करण्याकरिता ठेवण्यात आले आहे. सदरील वस्तूंची व्यक्तीशः पाहणी करण्याकरिता कार्यालयीन वेळ सकाळी १०:०० ते सायंकाळी ०६:०० पर्यंत ठेवण्यात आली आहे.उपरोक्त वस्तूंची विक्री करण्याकरिता लिलाव **दिनांक दि. ११/०५/२०२६ रोजी सोमवार या दिवशी** समितीद्वारे आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये बोली बोलणारे व्यक्ति तथा संस्था यांनी सकाळी १०.०० वाजता उपस्थित राहून बोलीकरिता अग्रिम अनामत रक्कम **रुपये ५०००/- डी.डी. अनामत रकमेचा 'डिमांड ड्राफ्ट' - DDO, Directorate of Research, Dr. PDKV, Akola** यांच्या नावे बंद लिफाफ्यात न टाकता स्वतंत्र डिमांड ड्राफ्ट संशोधन संचालनालय या कार्यालयात बंद लिफाफा उघडण्यापूर्वी लिलावाच्या दिवशी जमा करावेत नंतरच संबंधित दर पत्रक उघडण्यात येतील व लिलाव प्रक्रियेत भाग घेता येईल.
(संपर्क - 9527812462)

संशोधन संचालक
डॉ प.दे.कृ.वि., अकोला

**जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती:**

१. लिलावात निघालेले भंगार निरुपयोगी व नादुरुस्त अशा जड वस्तू, इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, यंत्रसामुग्री, संगणक, लाकडी वस्तु व ईतर साहित्य यांचा लिलाव **"जसे आहेत जिथे आहेत"** या तत्वावर केल्या जाईल.
२. ठरलेल्या दिवशी लिलावाच्या दिवशी योग्य बोली बंद लिफाफ्यात सदर करावी. जर एकच बोली लावणारा असेल तर लिलाव रद्द करण्यात येईल. हा निर्णय लिलाव कमेटी घेईल
३. जुन्या भंगार साहित्याच्या लिलावात समावेश असून त्याचा लिलाव करण्यात येईल.
४. लिलाव समिति बोली बोलणाऱ्या व्यक्तीची जास्तीत जास्त बोली मान्य असेल, त्यांना लिलावाची बोली पाहून मान्यता देण्यात येईल व त्याबाबतचा अंतिम निर्णय गठित समिति घेईल. अपेक्षित किंमत आल्याशिवाय लिलावाची बोली मान्य करणे लिलाव समितीच्या निर्णयावर अवलंबून राहील.
५. साहित्य बोली कायम झाल्यास संपूर्ण रक्कमेच्या ५०% रक्कम लिलाव त्याच दिवशी भरावी लागेल व उर्वरित ५०% रक्कम लिलाव अंतिम झाल्यापासून तीन दिवसाच्या आत भरावी लागेल. लिलावाची संपूर्ण रक्कम कार्यालयात जमा केल्यानंतर साहित्याची उचल करता येईल रक्कम न भरल्यास सदर लिलाव रद्द करण्यात येईल.
६. बोली कायम झाल्यास संबंधित व्यक्तींनी सर्व साहित्य ताब्यात मिळताच स्वखचनि उचल करणे व वाहून नेण्याची त्यानंतर सर्व खर्चाची व जोखमेची जबाबदारी त्याची स्वतःची असेल.
७. लिलाव कोणत्याही कारणास्तव रद्द करण्याचा अधिकार गठित समितीकडे राखून ठेवला आहे.
८. लिलावाबाबत काही तक्रार असल्यास त्याच दिवशी तशी लेखी स्वरुपात लिलावाच्या ठिकाणी लिलाव संपेपर्यंत द्यावी.
९. लिलाव समितीचे सदस्य व संबंधित कार्यालयीन कर्मचारी लिलावाचा ठिकाणी उपस्थित राहू शकतील व निरीक्षण करतील.

**प्रती,**
**Officer Incharge**
**ARIS Cell**
**Dr. PDKV, Akola** यांना विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिद्धी करीता

## संशोधन संचालनालय, डॉ. पंदेकृवी,अकोला

## लिलावाच्या सूचना व अटी व शर्ती

**विषय: संशोधन संचालनालय, डॉ. पंदेकृवी, अकोला अंतर्गत निरुपोयोगी जड़वस्तू व किरकोळ विविध साहित्याची विक्री करिता मोहर बंद दर पत्रक सादर करणे बाबत....**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संबंधित सहभागी होणाऱ्या लिलाव धारकास कळविण्यात येते की, संशोधन संचालनालय, डॉ. पंदेकृवी, अकोला अंतर्गत येत असलेल्या स्टोअर रूम क्र. १०२ मधील विविध प्रकारच्या निर्लेखित केलेल्या निरुपयोगी जडवस्तूची खालील अटी व शर्ती च्या अधीन राहून **'बंद लिफाफा'** लिलाव पद्धतीद्वारे विक्री करणे आहे. तरी इच्छुक लिलावधारकानी आपले **दर पत्रक मोहर बंद लिफाफ्यात दिनांक ०६/०५/२०२६ ते ०८/०५/२०२६** दरम्यान **संध्या. ५:३०** वाजेपर्यत या नावाने संशोधन संचालनालय, डॉ. पंदेकृवी, अकोला या कार्यालयात सादर करावे. अंतिम दिनांक (०८/०५/२०२६) नंतर येणाऱ्या दर पत्रकांचा कुठल्याही प्रकारचा विचार करण्यात येणार नाही. **प्राप्त दर पत्रक बंद लिफाफा दि. ११/०५/२०२६** रोजी सकाळी ११.०० वाजता सर्व सहभागी लिलावधारक व समिती समक्ष उघडण्यात येतील. त्याकरिता दर पत्रक सादर केलेल्या संबंधित लिलावधारकाची या कार्यालयात नमुद वेळेत (दि. ११/०५/२०२६ रोजी) रु. ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) रकमेचा **डिमांड ड्राफ्ट सोबत आधार कार्ड, जी.एस.टी. प्रमाणपत्र, शॉप अॅक्ट परवाना, पॅन कार्ड यांच्या छायांकित प्रत व मूळ प्रत** घेऊन स्वखर्चाने उपस्थित राहणे अनिवार्य आहे. जे दरपत्रक सादर करणारे लिलावधारक वरील दस्तावेज व डी.डी. सह हजर राहणार नाहीत त्यांची कोणतीच तक्रार नंतर विचारात घेतली जाणार नाही. व त्यांना लिलाव प्रक्रीये मधुन बाद करण्यात येईल. सदर प्रक्रीया बाबत सविस्तर अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत तरी दर पत्रक भरण्यापूर्वी सर्व खाली दिलेल्या अटी व शर्तीचे अवलोकन करावे.

1. फक्त **दर पत्रक बंद लिफाफ्यात दि. ०६/०५/२०२६ ते दि. ०८/०५/२०२६** दरम्यान संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत संशोधन संचालनालय या कार्यालयात सादर करावे. त्यानंतर येणारे दर पत्रकाचा विचार करण्यात येणार नाही. तत्पूर्वी इच्छुक लिलाव धारकांनी दर पत्रक भरण्यापूर्वी वस्तूची पाहणी २ ते ३ दिवसापूर्वी करावी. सदरील वस्तू साहित्य पाहणी करिता मुख्य कार्यालयाच्या परिसरात उपलब्ध राहतील.
2. दर पत्रक भरताना फक्त लिलाव धारकांनीच दरपत्रक भरावे सोबत ईतर कोणीही जाऊ नये. दर पत्रक भरल्याची पोच पावती लगेच दिल्या जाईल. सदरची पावती **दि. ११/०५/२०२६** रोजी लिलावात सहभागी होण्याकरिता **रु. ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त)** डिमांड ड्रापट, आधार कार्ड, जी.एस.टी. प्रमाणपत्र, शॉप अॅक्ट परवाना, पॅन कार्ड इत्यादीच्या छायांकित प्रत व मूळ दस्तावेजसह उपस्थित राहावे.
3. लिफाफ्याच्या वरील बाजुस **"निरुपयोगी जडसाठा साहित्याची खरेदी करिता दर पत्रक"** असे स्पष्ट अक्षरात नमूद करावे.
4. दर पत्रक सादर करणाऱ्या लिलाव धारकास **रु ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त)** अनामत रकमेचा **'डिमांड ड्राफ्ट' - DDO, Directorate of Research, Dr. PDKV, Akola** यांच्या नावे बंद लिफाफ्यात न टाकता स्वतंत्र डिमांड ड्राफ्ट संशोधन संचालनालय या कार्यालयात बंद लिफाफा उघडण्यापूर्वी आधार कार्ड, जी.एस.टी. प्रमाणपत्र, शॉप अॅक्ट पस्वाना, पॅन कार्ड यांच्या पतसह समिती समक्ष लिलावाच्या दिवशी जमा करावेत नंतरच संबंधित दर पत्रक उघडण्यात येतील व लिलाव प्रक्रियेत भाग घेता येईल.
5. बंद लिफाफा लिलाव प्रक्रिया सुरु करत असतांना ज्या लिलावधारकाने प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी **रु. ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त)** डी डी अनामत रक्कम म्हणून जमा केलेला आहे, अशाच लिलावधारकास सदर प्रक्रियेत सहभाग घेता येईल.
6. खरेदीदारास जडवस्तू व किरकोळसाठा पाहायचा असल्यास दिनांक ०६/०५/२०२६ ते ०८/०५/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत स्वखर्चाने उपस्थित राहून पाहता येईल व पूर्ण पाहणी केल्यानंतर दर पत्रक बंद लिफाफा मध्ये सिलबंद करून कार्यालयात दि. ०६/०५/२०२६ ते ०८/०५/२०२६ (सायं. ५:३० पर्यंत) या कालावधीत जमा करावे. (प्रपत्र-१ व प्रपत्र-२ विद्यापीठच्या संकेतस्थळ (www.pdkv.ac.in) येथुन प्राप्त करून त्यामध्ये जी.एस.टी. @ १८% सह एकत्रित दर भरावे.
7. निरुपोयोगी जडवस्तू व किरकोळ साठा खरेदीदारास (ज्याचे स्पर्धात्मक दर मंजूर केल्या जातील त्यास) संपूर्ण रक्कम जमा केल्याशिवाय अवजड वस्तूसाठा ताब्यात दिल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी. संपूर्ण रकमेचा भरणा केल्याची कार्यालयीन पावती कार्यालयामार्फत त्वरित दिल्या जाईल. ज्या लिलाव धारकाची सर्वात जास्त रक्कम राहील त्या लिलावधारकास **एकत्रित रक्कम डिमांड ड्राफ्ट च्या**

**स्वरुपात दि. १४/०५/२०२६** पूर्वी / रोजी पर्यंत या कार्यालयास जमा करावी लागेल. सदर रकमेचा भरणा होईपर्यंत सदर रकमेच्या १०% अनामत रक्कम त्वरित रोख स्वरुपात भरावी लागेल. व उर्वरित रकमेचा भरणा केल्यावर अवजड साठा ताब्यात देण्यात येईल.

8. या कार्यालयातर्फे वाहन सुविधा, वाहनांमध्ये जडवस्तू व किरकोळसाठा भरणा करणेकरीता मजूर इत्यादी सुविधा पुरविण्यात येणार नाही. ज्या लिलावधारकांचे दर मंजूर झालेत त्या लिलावधारकास साहित्याची उचल संशोधन संचालनालय कार्यालय परिसरामधून साहित्याची उचल स्वखर्चाने कार्यालयीन वेळेत व शासकीय सुटीचे दिवस वगळून करावी लागेल.

9. दर पत्रक सादर करावयाचा नमुना (पपत्र-१) सोबत जोडण्यात आलेला आहे. फक्त त्याव नमुन्यामध्ये जडवस्तू साठा खरेदी बाबतचे साहित्याचे/वस्तूचे

10. (ढिगाऱ्या नुसार) एकत्रित दर तसेच ज्या ठिकाणी स्वतंत्र साहित्य नमूद केलेले आहे अशा ठिकाणी स्वतंत्र दर (जी.एस.टी. १८% सह) भरून अधिकृत स्वाक्षरी, नाव व पत्ता सह मोहरबंद लिफाफ्यात विहित मुदतीच्या आत दर पत्रक सादर करणे अनिवार्य आहे. उशिरा प्राप्त होणाऱ्या दर पत्रकांचा कुठल्याही प्रकारचा विचार होणार नाही.

11. ज्या लिलावधारकाची बंद लिफाफ्यातील उच्चतम दर मंजूर झाल्या नंतर सदर साहित्याची उचल करण्याची तसेच त्यावरील देखरेखेवी जबाबदार संबंधिताची राहणार तसेच मंजूर दराची संपूर्ण रक्कमेचा भरणा डिमांड ड्राफ्टच्या स्वरुपात केल्यानंतरच सात दिवसाच्या आत सदर साहित्याची उचल करण्यास अनुमती देण्यात येईल. लिलावधारकाने सदर वस्तू उचल करण्यास नकार दिल्यास अनामत रक्कम परत दिल्या जाणार नाही.

12. समान दर आढळल्यास, संबंधित समान दरपत्रक सादरकर्ता यांच्या दोघापैकी जे अधिकतम दर देतील अथवा इतर दर पत्रक सादर करणाऱ्यापैकी जे सर्वाधिक दर संबंधित लॉट करिता देतील अशांना सदर साहित्य देण्यात येईल.

13. एकाच व्यक्तीने अथवा प्रतिष्ठानामार्फत एकापेक्षा अधिक दर पत्रक लिलावात सहभागी होण्याकरिता सादर केल्यास सदरचे सारखे दर पत्रक रद्द करण्यात येतील.

14. सदर प्रक्रीयेबाबत दरपत्रक सादरकर्त्यास कुठल्याही प्रकारचा आक्षेप अथवा तक्रार असल्यास दर पत्रक सादर करण्याच्या दिनांकापुर्वी किंवा प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वी त्याच दिवशी सादर करावा. एकदा समितीची कार्यप्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कुठल्याच प्रकारचा आक्षेप तक्रार किंवा दावा या कार्यालयामार्फत विचारात घेतल्या जाणार नाही.

15. जडवस्तू व किरकोळ विक्री लिलावाबाबत अपेक्षित दर प्राप्त न झाल्यास सदर जडवस्तू व किरकोळसाठा लिलाव अंशात विक्री, पूर्णता विक्री करणे किंवा संपूर्ण लिलाव प्रक्रिया रद्द करणेबाबतचे अधिकार मा. संशोधन संचालक तथा लिलाव समिती यांनी राखून ठेवले आहे. त्याबाबत कोणतीही तक्रार ग्राह्य धरण्यात येणार नाही.

16. संबंधित दरपत्रक सदर कार्यालयास वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे स्वतंत्र प्रमाणपत्र (प्रपत्र-२ नुसार) लिफाफ्यात नाव, स्वाक्षरी व आधार कार्ड प्रतसह सादर करणे आवश्यक आहे.

**संशोधन संचालक**
**डॉ प.दे.कृ.वि., अकोला**

**प्रपत्र- १**

दर पत्रक नमुना

प्रती,
मा. संशोधन संचालक
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

**विषयः संशोधन संचालनालय, डॉ. पंदेकृवी, अकोला अंतर्गत निरुपोयोगी जड़वस्तू व किस्कोळ विविध साहित्याची विक्री करिता मोहर बंद दर पत्रक सादर करणे बाबत.**

**संदर्भः** विद्यापीठ जाहिरात क्र. .......... दि. ................पेपरचे नाव................ किंवा विद्यापीठ संकेतस्थळ प्रसिद्धी ई. नुसार

महोदय,

मी खालील सही करणार, वरील सदर्भीय विषयानुसार निरुपोयोगी जड़वस्तू व किरकोळ विविध साहित्याच्या खरेदीच्या अनुषंगाने लिलावात सहभागी होण्याकरिता खालील प्रमाणे दर सादर करीत आहे.

| **अक्र.** | **विभागाचे नाव** | **स्टोअर रूम** | **रक्कम (रु.)** |
|---|---|---|---|
| १. | संशोधन संचालनालय | क्र. १०२ | |

स्वाक्षरी:.____________________

नाव :____________________

आधार क्र.: ____________________

भ्रमनध्वनी क्र.:____________________

**प्रपत्र- २**

प्रमाणपत्र

मी खालील स्वाक्षरीकर्ता/दर पत्रक सादर कर्ता या द्वारे प्रमाणित करतो कि, संशोधन संचालनालय, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला मार्फत बंद लिफाफा लिलाव प्रक्रिया मध्ये कोणाच्याही दबावाखाली न राहता स्वमर्जीने सहभागी होत आहे. तसेच लिलावा करिता नेमून दिलेल्या सर्व अटी व शर्ती (अ. क्र.१ ते. १६) मला मान्य असुन त्याच्या अधीन राहून मी सदस्च्या बंद लिफाफा लिलाव प्रक्रीयेमध्ये दर सादर करीत आहे.

तसेच, दर सादर करण्यापूर्वी मी स्वतः सर्व साहित्याची प्रत्यक्ष पाहणी करून व सर्व अटी व शर्तीत अवलोकन करून दर सादर केलेले आहेत व त्याबाबत मला कुठल्याही प्रकारचा आक्षेप अथवा दावा राहणार नाही याची मी खात्री देतो. मी लिलावामध्ये सहभागी होतांना **रुपये ५०००/- चा डिमांड ड्राफ्ट, आधार कार्ड. जी.एस.टी. प्रमाणपत्र, शॉप ॲक्ट परवाना, पॅन कार्ड ईत्यादीच्या छायांकित प्रत व मुळ प्रतीसह स्वतः उपस्थित राहणार असुन, मी सदर दस्तावेज लिलावा दरम्यान सादर न केल्यास माझे दर पत्रक खारीज रद्द केल्या जाणार असल्याची मला पूर्ण जान आहे.**

स्वाक्षरीः ______________________________

दर पत्रक सादर करणाऱ्याचे नावः ______________

______________________________

पता: ______________________________

आधार क्र. ______________________________

मो.क्र. ______________________________